# जिल्हा परिषद चंद्रपुर

## जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती

**जाहिरात क्रमांक:- 01/2023**

## शुध्दीपत्रक क्र.1

**दि. 24/08/2023**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सुधारणा |
|---|---|---|
| 1 | कनिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | कनिष्ठ सहाय्यक/ कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या संवर्गासाठी मराठी टंकलेखन आवश्यक करण्यात आलेले आहे, असे जाहिरातीत नमुद आहे.<br>तथापि माजी सैनिक , प्रकल्पग्रस्त , भुकंपग्रस्त , स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन 1991 चे जनगणना कर्मचारी, सन 1994 नंतरचे निवडणुक कर्मचारी, पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी व अनाथ मधुन अर्ज करणा-या ज्या उमेदवारांकडे मराठी टंकलेखन नाही, असे उमेदवार देखील अर्ज करु शकतील |
| 2 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाचा ऑनलाईन अर्ज करताना Have you passed recognized equivalent two Years Course in Construction Supervisor ? असा प्रश्न विचारणेत आला होता. परंतु सदरचा कोर्स हा एक वर्षाचा असल्यामुळे त्या पदासाठी उमेदवार अर्ज सादर करु शकत नव्हते.<br>तथापि त्यामध्ये सुधारणा करणेत आली असून आता Have you passed recognized equivalent Course in Construction Supervisor ? असा प्रश्न विचारणेत येत आहे. त्यामुळे सदर पदासाठी इच्छुक उमेदवार आपले अर्ज सादर करु शकतील. |
| 3 | कंत्राटी ग्राम सेवक / पशुधन पर्यवेक्षक | कंत्राटी ग्राम सेवक / पशुधन पर्यवेक्षक या संवर्गामध्ये संगणक हाताळणी वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार अर्ज करु शकतात असे जाहिरातीत नमुद आहे.<br>आता त्याच बरोबर जे उमेदवार दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण झाले असतील.<br>किंवा<br>अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली(AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदवीका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार<br>किंवा<br>इंडियन सट्रिफिकेट ऑफ स्कुल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत मान्यताप्राप्त इयता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण झाले असतील.<br>वरीलपैकी कोणत्याही एक प्रकारे संगणक व माहिती तंत्रज्ञानाबाबतचे प्रमाणपत्र धारण करीत असतील असे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करु शकतील. |
| 4 | विस्तार अधिकारी (शिक्षण) | विस्तार अधिकारी (शिक्षण) या संवर्गामध्ये ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराचा अनुभव हा सदर पदाचीं शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचा ग्राहय धरला जात होता.<br>तथापि आता सदर पदाचा ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराचा अनुभव हा सदर पदाची शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीचा असेल तरी तो ग्राहय धरला जाणार आहे. |

**स्वा/-**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी ,चंद्रपुर**

**स्वा/-**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद चंद्रपुर**

**स्वा/-**
**सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)**
**जिल्हा परिषद चंद्रपुर**